दिनांक ०७/०७/२०२६

# “पोलीस आयुक्तांची भेट उपक्रमाबाबत”

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा. श्री. विनय कुमार चौबे यांच्या संकल्पनेतून हद्दीतील नागरिक व तक्रारदारांना त्यांच्या तक्रारी, समस्या व सूचना पोलीस आयुक्तांसमोर प्रत्यक्ष मांडता याव्यात तसेच त्यांचे त्वरित निराकरण करण्याच्या उद्देशाने “पोलीस आयुक्तांची भेट” हा उपक्रम दर शुक्रवारी सकाळी ११.३० ते दुपारी ०१.३० या वेळेत पोलीस आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात येतो.

श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्‌गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा - २०२६ अनुषंगाने पोलीस बंदोबस्ताची व्यापक तयारी व अंमलबजावणी सुरु असल्यामुळे शुक्रवार दिनांक १०.०७.२०२६ रोजी हा उपक्रम आयोजित करण्यात येणार नाही.

सदर उपक्रम शुक्रवार दिनांक १७.०७.२०२६ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी ०१.३० या वेळेत पूर्वनियोजित स्वरुपात आयोजित करण्यात येईल. त्यानंतर हा उपक्रम दर शुक्रवारी नियमितपणे त्याच वेळेत सुरु राहील.

तरी नागरिकांनी यांची नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

जनसंपर्क अधिकारी
पिंपरी चिंचवड आयुक्तालय